**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर कडेगांव यांच्या न्यायालयात,**
**ता.कडेगांव, जिल्हा सांगली.**

**नियमीत दिवाणी दावा क्र.१४९/२०२३**

**शंकरराव दत्तात्रय पवार वगैरे ...... वादी**

**विरुध्द**

**कृष्णत दिनकर पवार वगैरे ...... प्रतिवादी**

## निशाणी ५ वरील आदेश

निशाणी ५ वरील अर्ज वादींनी प्रतिवादी क्र.१ विरुध्द अर्जातील कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळकतींसंबंधी (त्यांना दावा मिळकती असे संबोधण्यात येईल) तुर्तातुर्त मनाई मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. **वादींचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे** –

दावा मिळकतींपैकी गट नं.७३६ व ७४० या मिळकती वादी नं.१ ते ४, गट नं.७३७ ही मिळकत वादी नं.६ ते ८ व गट नं.७३८ ही मिळकत वादी नं.५ च्या मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची मिळकत आहे. गट नं.७३२ ही मिळकत प्रतिवादी क्र.१ याची असून त्याच्या उत्तर बाजुस मिळकतीत येण्याजाण्याकरीता पुर्वापार रस्ता उपलब्ध आहे. प्रतिवादी क्र.१ ने तहसिलदार कडेगांव यांचेकडे रस्ता केस नं.९/२१ दाखल केली असून दिनांक १०/०४/२०२३ रोजी रस्ता केसचे कामी निर्णय होवून प्रतिवादी क्र.१ ला दावा

मिळकतींच्या सरबांधावरुन त्याच्या मिळकतीत जाण्याकरीता गाडी रस्ता मंजूर झाला आहे. दावा मिळकतींपैकी गट नं.७३७ व ७४० या मिळकतीत विहीरी आहेत. दावा मिळकतींपैकी गट नं.७४० मध्ये वादींची जुनी आंब्याची झाडे आहेत. त्यामुळे दावा मिळकतींमधून रस्ता झाल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे. त्यामुळे रस्ता केस नं.९/२१ चे कामी झालेला निर्णय रद्द होवून मिळण्याकरीता वादींनी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत प्रतिवादी क्र.१ ने दावा मिळकतीतून रस्ता करु नये अशी प्रतिवादी क्र.१ ला तुर्तातुर्त ताकीद देण्यात यावी अशी वादींनी विनंती केली आहे.

३. **प्रतिवादी क्र. १ ने निशाणी ३० येथे म्हणणे दाखल केले आहे ते थोडक्यात खालीलप्रमाणे**

प्रतिवादी यांची मिळकत गट नं.७३२ पुर्णपणे पडीक आहे. प्रतिवादीस त्या मिळकतीत जाण्यायेण्याकरीता कोणताही रस्ता उपलब्ध नसलयाने रस्ता केस. नं.९/२१ चे कामी तहसिलदार कडेगांव यांनी दावा मिळकतींच्या सरबांधावरुन रस्ता मंजूर केला आहे. रस्ता केस नं.९/२१ चे कामी पारीत करणेत आलेला निर्णय योग्य आहे. त्या निर्णयानुसार प्रतिवादीस रस्ता करण्याची परवानगी न दिल्यास प्रतिवादीचे क्षेत्र पडीक राहून त्याचे अपरिमित नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करावा अशी प्रतिवादीने विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी क्र.१ यांच्या कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ असुन त्यांचे निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादींनी सकृतदर्शनी केस असल्याचे शाबीत केले आहे का ? | नकारार्थी |
| २. | न्यायाचा समतोल वादींचे बाजुने आहे असे वादींनी शाबीत केले आहे का ? | नकारार्थी |
| ३. | तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजुर झाल्यास वादींचे कशानेही न भरुन येणारे असे नुकसान होईल असे वादींनी शाबीत केले आहे का ? | नकारार्थी |
| ४. | काय आदेश ? | नि. ५ चा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

५. दोन्ही बाजुच्या वकिलांचा प्रदीर्घ युक्तीवाद ऐकला.

**मुददे क्र. १ ते ४ करीता.**

६. वादींनी खालील कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे.

| अ.क्र | कागदपत्र | निशाणी |
|---|---|---|
| १. | दावा मिळकतींचे ७/१२ उतारे | निशाणी ८ ते ११ |
| २. | कृष्णत पवार यांनी रस्ता केस नं.९/२१ चे कामी केलेला अर्ज | निशाणी ३/५ |
| ३. | कृष्णत पवार यांनी स्थळ पाहणी पंचनामेस दिलेले म्हणणे | निशाणी ३/६ |
| ४. | बाळासो पवार यांनी स्थळ पाहणी पंचनामेस दिलेले म्हणणे | निशाणी ३/७ |
| ५. | दावा मिळकतींचा कच्चा हात नकाशा | निशाणी ३/८ |

| | | |
|---|---|---|
| ६. | रस्ता केस नं.९/२१ चे निकालपत्र | निशाणी ३८ |
| ७. | रस्ता केस नं.९/२१ चे कामी दिलेला मुळ अर्ज | निशाणी ३/१० |
| ८. | गाव  नकाशा | निशाणी ३/११ |
| ९. | स्थळ पाहणी पंचनामा | निशाणी ३/१३ |
| १०. | दावामिळकतींचे फोटो | निशाणी १४/१ |
| ११. | फोटोचे बिल | निशाणी ३५/१ |
| १२. | फोटोची सि.डी. | निशाणी ३५/२ |
| १३. | साक्षीदार सुर्यकांत सदाशिव यादव यांचे प्रतिज्ञापत्र | निशाणी ३६ |

**७.** प्रतिवादी क्र.१ ने खालील कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे.

| **अ.क्र** | **कागदपत्र** | **निशाणी** |
|---|---|---|
| १. | रस्ता केस नं.९/२१ चे निकालपत्र | निशाणी ३३/१ |
| २. | स्थळ पाहणी पंचनामा | निशाणी ३३/२ |
| ३. | वादीने तंटामुक्ती अध्यक्ष शिवणी यांचेकडे दिलेला अर्ज | निशाणी ३३/३ |
| ४. | तंटामुक्ती अध्यक्ष यांचा अहवाल | निशाणी ३३/४ |
| ५. | गट नं.७३२ चे फोटो | निशाणी ३३/५ |
| ६. | प्रतिवादी क्र.१ ने तहसिलदार कडेगांव यांचेकडे दिलेला अर्ज | निशाणी ३३/७ |

८. **<u>अर्जातील मान्य कथने –</u>**

१. दावा मिळकती या वादींच्या मालकीच्या असून गट नं.७३२ ही मिळकत प्रतिवादी क्र.१ च्या मालकीची आहे.

२. रस्ता केस नं.९/२१ चे कामी दावा मिळकतींच्या सरबांधावरुन गट नं.७३२ पर्यंत गाडी रस्ता मंजूर करण्यात आलेला आहे.

९. वादींच्या कथनानुसार रस्ता केस नं.९/२१ चे कामी पारीत करण्यात आलेला निर्णय चुकीचा व बेकायदेशीर आहे. वादींचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ यास रस्ता केस नं.९/२१ चे निकालानुसार रस्ता करणेची परवानगी देणेत येवू नये. वादींनी रस्ता केस नं.९/२१ चा निकाल अनेक मुद्यांवर आव्हानित केला आहे. त्यापैकी प्रथम मुद्दा असा आहे की, प्रतिवादी क्र.१ च्या मिळकत नं.७३२ मध्ये जाणेयेणेकरीता अन्य रस्ता उपलब्ध आहे, त्यामुळे दावा मिळकतींच्या सरबांधावरुन रस्ता करण्याची आवश्यकता नाही. वादींनी प्रतिवादी क्र.१ च्या मिळकतीत येणेजाणेकरीता अन्य रस्ता उपलब्ध आहे असे दाखविण्याकरीता केवळ एक नकाशा दाखल केला आहे. परंतू नकाशामध्ये गट नं.७३२ मध्ये येण्याजाण्याकरीता कोणता रस्ता उपलब्ध आहे ते स्पष्ट होत नाही. याउलट रस्ता केस नं.९/२१ चे कामी करण्यात आलेल्या स्थळपाहणी पंचनाम्यात असा उल्लेख आहे की, गट नं.७३२ मध्ये येण्याजाण्याकरीता पर्यायी रस्ता दिसून येत नाही. स्थळ पाहणी पंचनाम्यातील हा उल्लेख निश्चीतपणे प्रतिवादी क्र.१ च्या कथनांना पुष्टी देणारा आहे. त्यामुळे वादी म्हणतात

तसा अन्य रस्ता गट नं.७३२ मध्ये येण्याजाण्याकरीता उपलब्ध नसल्याचे दिसून येते.

**१०.** वादींनी रस्ता केस नं.९/२१ चा निकाल या मुद्यावर देखील आव्हानित केला आहे की, दावा मिळकतींपैकी गट नं.७४० व ७३७ मध्ये विहीरी असून दावा मिळकतींमध्ये वादींची आंब्याची झाडे आहेत. दावा मिळकतींमधून रस्ता केल्यास विहीर व झाडांचे नुकसान होणार आहे. यामुद्यावर रस्ता केस नं.९/२१ च्या निकालाचे अवलोकन करता, प्रतिवादी क्र.१ यास असा आदेश देण्यात आला आहे की, दावा मिळकतींच्या सरबांधावरुन रस्ता करताना झाडांचे कोणतेही नुकसान होवू द्यायचे नाही तसेच विहीरी भोवती संरक्षक कठडा बांधावा असा आदेश पारीत करणेत आला आहे. त्यामुळे मंजूर झालेला रस्ता योग्य ती खबरदारी घेवून करावयाचा असल्याने वादींच्या विहीरीचे अगर झाडांचे नुकसान होण्याचा प्रश्न निर्माण होत नाही.

**११.** वादींनी रस्ता केस नं.९/२१ चा निकाल चुकीचा व बेकायदेशीर आहे असे कथन केले आहे. परंतू तो निकाल चुकीचा आहे अगर कसे ही बाब दोन्ही पक्षकारांना पुराव्याची संधी दिल्याशिवाय निर्णीत करता येणार नाही. प्रस्तुत अर्जाचा विचार करता, प्रथमदर्शनी रस्ता केस नं.९/२१ चा निकाल चुकीचा व बेकायदेशीर आहे असे दिसून येत नाही. प्रतिवादी क्र.१ ची मिळकत गट नं.७३२ ही पडीक असून त्याच्या मिळकतीत येण्याजाण्याकरीता रस्ता मंजूर झाला असल्याने तो रस्ता करण्यास प्रतिवादी क्र.१ यास मनाई केल्यास त्याचे अपरिमित नुकसान होणार आहे. याउलट दावा मिळकतींच्या सरबांधावरुन रस्ता मंजूर झाला असून योग्य ती खबरदारी घेवूनच रस्ता करायचा असल्याने

वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी केस, न्यायाचा समतोल ही तत्वे देखील प्रतिवादी क्र.१ च्या बाजुने आहेत. म्हणून मी मुद्दे क्र.१ त ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.४ करिता मी खालील आदेश पारित करते.

**<u>आदेश</u>**

१. वादी यांचा नि. ५ चा अर्ज नामंजुर करण्यात येतो.

२. अर्जाचा खर्च दाव्यासोबत.

PRAJKTA RAJIV SABNIS

Digitally signed by PRAJKTA RAJIV SABNIS
Date: 2023.08.08 17:44:00 +05'30'

कडेगांव

**(प्राजक्ता रा.सबनीस)**

दि. ०७/०८/२०२३

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कडेगांव